# परमपूज्य परब्रम्ह ॐकारस्वरुप श्री सद्गुरु स्वामी भगवान महाराजांची जीवनयात्रा

या सद्गुरु सांप्रदायाची अर्थात सद्गुरु दरबारची स्थापना होवून जवळ-जवळ ७० ते ७५ वर्षाचा कालावधी लोटला आहे. ह्याची स्थापना करणारे परम् पुज्य श्री. सद्गुरु भगवान महाराजांचा जन्म (मानवी स्थितीप्रमाणे नामाभिमान श्री. भगवान नारायण पोखरे) सुमारे १०० वर्षापूर्वी कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यात वसलेल्या श्री क्षेत्र वालावल गावात पोखरे (चौधरी) कुटुंबात झाला.

बालपणीचा काही कालावधी मातेच्या छत्रछायेत गावातच व्यतित केल्यानंतर शिक्षणाकरिता मातेबरोबर मुंबईस प्रयाण झाले. वडिल नोकरी निमित्त आधीच मुंबईत स्थाईक झालेले होते. मुंबईत आल्यानंतर मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण पूरे केले खरे पण सतत समाजसेवेची आवड असलेले मन नोकरीत गुंतण्याचे नाव नव्हते. बालपणातून तारुण्यात पदार्पण होत असताना प्रेमळ मातेच्या सहवासाने असामान्य संस्कारही झाले. कालक्रमणेनुसार वयाच्या २०-२५ वर्षाचे वयोमान असताना मातेचे छत्र हरपले पण मातेने अखेरचा श्वास घेताना दिलेल्या अद्वितीय अनुभवामुळे पूर्णत्वाने जगण्याची दिशाच बदलली. मातेने आपले संपूर्ण तेज पूत्र नजरेत एकवटून श्वास सोडला. या घटनेने विरक्ती अन् वैराग्याकडे कल वाढला. आधीच समाजकार्याची आवड अन् जोडीस आलेली विरक्ती ह्यामुळे मुंबईत आपला पुत्र नोकरीत काय रममाण होत नसावा अशी वडिलांच्या मनाची धारणा झाली. म्हणून याचे लग्न केल्यानंतर तरी संसारात रममाण होऊन स्थिर होईल अशा अपेक्षेने वडिलांनी लग्न लावून दिले.

अद्वितीय सहचारीणीच्या सहवासात संसारात रममाण देखिल झाले. पण समाजकार्याची अन् समाज प्रबोधनाची आवड स्वस्थ बसू देत नव्हती.

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोची साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा ।।

या उक्तिनुसार तळागाळातील लोकांच्या अडचणी दूर करुन त्यांना सन्मार्गाने जाण्यास प्रवृत्त करणे ह्याचाच ध्यास त्यांच्या मनाने घेतला होता. प्रापंचिक जबाबदारी संभाळण्यासाठी काही कालावधी सैन्यदलात, आस्थापन विभागात व्यतित केला. पण मनात वसलेला परमेश्वरी ध्यास व परोपकाराचा वसा काही स्वस्थ बसू देत नव्हता. त्यातच शितल, शांत, मनमिळाऊ, समंजस अशा सहचारीणीच्या साथीमुळे संसारात राहून परमार्थ साधता येतो याचीही पूर्णत्व जाणीव होती.

१९५० ते १९५६ च्या कालावधित संसार संघर्षमय व्यतीत होत असताना एके दिवशी सद्गुरु बाबांना सन्यस्त वेषात येऊन त्यांच्या सद्गुरुंनी गालाला हस्तस्पर्ष करुन अनुग्रहीत तर केलेच अन् स्वस्वरुपाची जाणीव दिली.

तुज आहे तुजपाशी । परंतु जागा चुकलाशी ।।

सद्गुरु स्वरुपात परमेश्वराचे दर्शनही दिले – हाच तो दुग्धशर्करा योग. येथुनच पूढे जगाच्या कल्याणा संताच्या विभुती अन् जया अंगी मोठेपण तयासी यातना कठीण ह्या दोहोचा अनुभव घेत असताना सामान्याना भक्तिमार्गाने, नामस्मरणाने, प्रेमाने त्या परमेशाप्रत कसे जाता येईल, त्याला डोळे भरुन कसे पाहता येईल ह्याचे मार्गदर्शन करण्यास सुरवात झाली. प्रवास जरी खडतर होता तरी ठाम ध्येय आणि अढळ निष्ठा याने पूर्णत्व प्रेरित होऊन ज्ञानाच्या दरबारची (मुख्य दरबार) स्थापना १९५६–५७ च्या सुमारास बावलावाडी, लालबाग, मुंबई येथे झाली. जे आज आपण मुख्य दरबार किंवा कर्तव्याचे प्रमुख स्थान म्हणून ओळखतो.

परस्त्री मातेसमान, मिथ्य भाषा त्याज्य, परधनाची अपेक्षा करु नये अन् मादक पदार्थ वर्ज्य ह्या चार तत्वावर आधारित या ज्ञानाच्या दरबारची स्थापना झाली. प्रापंचिक वास्तव्य मालाड, मुंबई (मुळाश्रम), कर्तव्य स्थान बावलावाडी, लालबाग, मुंबई (मुख्य दरबार), जन्मस्थान श्री क्षेत्र वालावल, तालुका कुडाळ (कोकण आश्रम) अन् भक्तांच्या आपुलकीने झालेला इंगळेवाडी, सातारा येथिल (सातारा आश्रम) अशा चार स्थानांची निर्मिती होऊन ज्ञानरुपी प्रवचनांच्या अमृतधारा भक्तांवर जिव्हाळयाने बरसु लागल्या. आपल्या अलौकिक वाणीने, अमृतमय प्रणवांनी भक्तांची, सेवेकऱ्यांची मनोभुमी शुध्द करुन त्यांना अनुग्रहीत केले. माझ्या भक्ताने त्या परमात्म्याला डोळे भरुन पहावे, ज्ञानमार्गी व्हावे हा एकच ध्यास सद्गुरु माऊलींच्या मनात होता. लौकिकार्थाने कोणत्याही प्रकारची प्रसिध्दी न करता केवळ तळागाळातून आलेला माझा सेवेकरी आपल्या भक्तिने, नामस्मरणाने, ध्यानाने परमेश्वराला कसा पाहू शकेल ह्याचेच ज्ञान अखंडितपणे निष्काम, निस्वार्थ गतीने ४० ते ४५ वर्षे केले.

स्वयम्पूर्णता, स्वयम्सिध्दता कशी अंगीकारावी ह्याचे सोदाहरण स्वकृतीने दाखवून दिले. वाड–वडिलांपासून प्राप्त झालेल्या वालावलच्या राहत्या घराची सद्गुरु आश्रम अशी नोंद सरकार दफतरी स्वहयातीतच केली. ते वालावल येथिल जन्मस्थान (कोकण आश्रम) आज भव्य दिव्य स्वरुपात परावर्तित झाले आहे. तद्वत् मुंबईत स्थित असलेले मालाड येथिल मुळआश्रम, कर्तव्य स्थान बावलावाडी, लालबाग, मुंबई (मुख्य दरबार) अन् इंगळेवाडी, सातारा येथिल (सातारा आश्रम) ही स्थाने देखिल भव्य दिव्य अशा स्वरुपात परावर्तित झालेली आहेत. सत्विचार, सत्आचरणाने मनाची सत्शुध्दता साधून नामस्मरणाने त्या परमेशाप्रत कसे जावे याचे अत्यंत विश्लेषक स्वरुपात आपल्या प्रवचनातून मार्गदर्शन केले.

१९५६ ते १९९३ अव्याहतपणे आपल्या अलौकिक वाणीने उपदेश करीत अज्ञानी सेवेकऱ्यांना मायेचा भवसागर कसा तरुन जाता येईल याचे ज्ञान दिले. अन् हे करीत असताना सेवेकऱ्यांच्या संसारिक दुःखांचे देखिल निरसन केले. फुलास आपला सुगंध कोणाला वेगळा द्यावा लागत नाही अन् तो देताना त्याच्याकडे दुजाभाव नसतो. तसेच सद्गुरु माऊलींनी भक्तगणांत गरीब–श्रीमंत, उच–निच असा कोणताही भेदभाव न बाळगता आपल्या प्रणवरुपी सुगंधाने न्हाऊ घालून, जीवन पुलकित करुन जीवनोध्दार केला.

जन्म आणि मृत्यु ही ह्या मृत्युगोलार्धाची अविभाज्य अंग आहेत. जन्माला येणाऱ्याला आज ना उद्या देहत्याग करावा लागणारच. त्याच सृष्टीच्या नियमाप्रमाणे सद्गुरु बाबांनी आपला देह दिनांक ९ मे १९९३ रोजी पंचतत्वात लय केला.

**दिव्यत्वाची जेथे प्रचिती । तेथे कर माझे जुळती ।।**